# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद – ४३१ ००५

# निविदा अर्ज

## (बागकाम करणेसाठी कंत्राटी सेवेची निविदा)

### – निविदा अर्ज किंमत, विक्री, स्विकृती व मिळण्याचे ठिकाण –

१. निविदा अर्ज विक्री :– दि. ९/०५/२०१७ ते १८/०५/२०१७ (सायं. ०४ वाजे पर्यंत)

२. निविदा भरण्यापुर्वीची मिटींग :– दि. १८/०५/२०१७ (सायं. ०५ वाजता)

शासकीय अभि. महाविद्यालय औरंगाबाद, विद्युत अभि. सेमिनार हॉल

३. निविदा स्विकृती :– दि. १९/०५/२०१७ ते २६/०५/२०१७ (सायं. ०५ वाजे पर्यंत)

४. निविदा उघडणे करिताची मिटींग – २९/०५/२०१७ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता

५. कोरी निविदा किंमत :– रूपये १०००/– ना परतावा

६. स्थळ :– विद्युत अभियांत्रिकी विभाग, शा.अ.म.औरंगाबाद

(शासकीय सुटीचे दिवस वगळुन)

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद – ४३१ ००५

*In Pursuit of Global Competitiveness*

Phone : (0240) 2366101,102,103,111 Fax : (0240) 2332835

E-Mail – principalgeca@yahoo.com Web – http://www.geca.ac.in


## निविदा धारकांना अत्यंत महत्वाच्या सुचना

निविदा धारकांनी बांगकाम कंत्राटीसेवा (दरपत्रक) खालील लखोटा (लिफाफा) पध्दतीने निविदा (दरपत्रक) सादर करावे.

**लखोटा (लिफाफा) क्रमांक :– १ (एक) यामध्ये खालील नमुद केलेली कागदपत्रे देण्यात यावी.**

अ) चालु वर्षाचे नुतणीकरण केलेले संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची (परवाना) ची साक्षांकीत प्रत

ब) संस्थेचे काम करण्यांचे कार्यक्षेत्राबाबत स्पष्ट उल्लेख असल्याबाबत संस्थेच्या पोट नियमाची (Byelaws) लागू असल्यास संबंधीत निबंधकांची प्रमाणित केलेली प्रत.

क) (EMD) सुरक्षा ठेव :– डिमांड ड्राफ्ट (दर्शनी हुंडी) रूपये २५०००/– (पंचवीस हजार मात्र) "**प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद**" यांचे नावे असलेली सोबत जोडावी.

ड) भविष्य निर्वाह क्रमांकाची व कामगार राज्य विमा क्रमांकाची प्रत

**टिप :–** उपरोक्त नमुद केलेल्या कागदपत्राची पूर्तता होत नसल्यास अशा निविदाधारकांची निविदा तात्काळ रद्द करण्यात येईल व अशा निविदा धारकांचा लखोटा (लिफाफा) क्रं.२ उघडण्यात येणार नाही.

**लखोटा (लिफाफा) क्रमांक :– २ (दोन) यामध्ये खालील नमुद केलेली कागदपत्रे सादर करावयाची आहेत.**

अ) संपुर्ण माहिती व दर भरण्यात आलेली निविदा (स्वाक्षरी व शिक्क्या सह)

ब) सर्वसाधारण व संबंधीत कंत्राटीसेवा बाबत अटी व शर्ती मान्य असल्याचे कंत्राटदाराच्या सही, शिक्क्यासह हमीपत्र

क) कंत्राटदार संस्थेच्या अनुभवाचा तपशिल व अनुभवासंबंधीची प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रत / प्रति.

**लखोटा (लिफाफा) क्रमांक :– ३ (तीन) यामध्ये लखोटा (लिफाफा) क्रं.१ व क्रं.२ सादर करावयाचे आहे या लखोटयावर कंत्राटीसेवेच्या कामाचे नाव ठळक अक्षरात बागकामासाठी निविदा असे लिहीणे आवश्यक आहे. सर्व लखोटे सिलबंद करणे आवश्यक असून लखोटयावर लखोटा क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.**

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
औरंगाबाद

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद – ४३१ ००५

*In Pursuit of Global Competitiveness*

Phone : (0240) 2366101,102,103,111 Fax : (0240) 2332835

E-Mail – principalgeca@yahoo.com Web – http://www.geca.ac.in


## बागकाम कामासाठी कंत्राटी सेवेची निविदा

## (हे दरपत्रक लिफाफा दोन मध्ये सादर करावे.)

प्रति,
मा. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
औरंगाबाद

**विषय :– संस्थेमधील बागकाम कामाकरिता कंत्राटी तत्वावर सेवा पुरविणे बाबत.**

महोदय,

आपल्या दिनांक /०५/२०१७ रोजीच्या दैनिक ———————— मधील जाहीरातीनुसार निविदा पाठविणेत येत आहे. या संस्थेची माहिती खालील प्रमाणे आहे.

**सेवा पुरविणाऱ्या**

०१) संस्थेचे नांव व पत्ता : ..............................................................

..............................................................

०२) संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक : ..............................................................

..............................................................

०३) संस्थेचा सदर कामाबाबत अनुभव : ..............................................................

..............................................................

<table>
<tr><th colspan="2">अ)मनुष्यबळ शुल्क</th></tr>
<tr><td>बगकामाकरिता आवश्यक असलेले मनुष्य बळाचे व त्यांना लागणाऱ्या सामानाचे वर्णन, ओळखपत्र, बुट, ड्रेस, हातमोजे इ. सारख्या एकसमान प्रशिक्षित बागकाम कर्मचारी संस्थेकरिता पुरविणे</td><td>शासकीय नियमानुसार सध्याच्या वेतनाचे डी.ए., ई.पी.एफ., बोनस, ई.एस.आय. आणि शासन नियमानुसार लागु असलेले दर प्रति माह प्रति व्यक्ती आणि शासन नियमानुसार इतर अटी व शर्ती सह<br><br>एकुण रक्कम रूपये ........................................</td></tr>
<tr><th colspan="2">ब) कंत्राटदाराची फी / सेवा शुल्क</th></tr>
<tr><td>सेवा शुल्क / कंत्राटदाराची फी मध्ये नियुक्त असलेल्या बागकाम कामगारामार्फत काम पुर्ण करण्याकरिता सर्व साधनसंपत्ती / संस्थेतील नियुक्त केलेल्या कामगारांचे कामाचे व्यवस्थापन करणे.</td><td>एकुण रक्कम प्रति माह प्रति बागकामगार व्यक्ती<br><br>एकुण रक्कम रूपये ........................................<br><br>(याबाबत गैरवास्तववादी / अस्पष्ट कोटेशन अपात्र ठरण्यास पात्र असु शकते)</td></tr>
</table>

वित्तीय निविदेमध्ये अधिलिखीत, दुरूस्त्या Interlineations इ. अनुमत नाहीत, आढळल्यास निविदा नाकारण्यात येईल.

सुचना :– (अ) मनुष्यबळ दर, किमान वेतन दर, शासकीय नियमानुसार लागु आहे आणि शासनाने वेळोवेळी सुधारणा / वाढीव अंमलबजावणी नुसार बदलू शकते. (ब) मध्ये नमुद केलेला सेवा शुल्क दर कंत्राटाच्या कालावधीमध्ये कोणत्याही परिस्थितीत स्थिर राहील आणि त्यापेक्षा जास्त राहणार नाही. जर कंत्राटदाराने विद्यमान सेवा शुल्क दर (शासकीय नियमापेक्षा) कमी भरल्यास सदरील निविदा नाकारण्यात येईल.

(ब) Vat लागु असल्यास चलनमध्ये आकारण्यात येईल. T.D.S. लागु असल्यास तो राज्य सरकारच्या नियमावलीनुसार वजा केला जाईल.

निविदाधारकाने त्याच्या कर्मचाऱ्याचे वेतन शासन नियमानुसार निश्चित करणे आवश्यक आहे. निविदाधारकाने कामावर असलेल्या कामगारांसाठी वैयक्तीक बॅंक खाते उघडल्यानंतर ई–हस्तांतरणाद्वारे पैसे भरणे आणि संबंधित कर्मचाऱ्यांचा मासिक बॅंक स्टेटमेंटची प्रत संस्थाप्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे तसेच ई.एस. आय. कार्डची प्रत, ई.पी.एफ. क्रमांक व ई.पी.एफ. खात्यावर भरलेल्या रक्कमेची प्रत वेळोवेळी संस्थाप्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे.

निविदेत नमुद केलेली रक्कम सेवा कर वगळता सर्व करांचा समावेश असेल. लागु असल्यास सेवा कर भरावा.

मी / आम्ही निविदा दस्तऐवजचे सर्व नियम अटी आणि शासन नियमांचे पालन करणार आहोत असे आम्ही जाहीर करतो. मी / आम्ही प्राचार्य शसकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांना आमची निविदा कुठलेही कारण न देता अपात्र करण्याचे अधिकार आहेत याची जाणीव आहे त्याबाबत मी/आम्ही कोणत्याही कोर्टाकडे त्याबाबत तक्रार किंवा दाद मागणार नाही.

सही :—

पदनाम :—

दिनांक

संस्थेचे नाव :—

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
# येथील बागकाम कामासाठी कंत्राटी सेवेबाबत सर्वसाधारण अटी व शर्ती

१) संस्थेसाठी आवश्यक बागकाम कामगारांची संख्या किमान ०४ असेल.

२) सदर कामाच्या निविदा दोन वर्षे कालावधी करिता मागविणेत आलेल्या आहेत.

३) निविदा सादर करणारी संस्था शासन नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. नोंदणी परवाना सेवा पुरवठा कालावधीमध्ये नुतणीकरण केलेला असणे आवश्यक आहे.

४) निविदा सादर करणेपुर्वी महाविद्यालयीन परिसराचा व विविध इमारतीचा आढावा घेणे व प्रत्यक्ष पाहणी करणे हे निविदा भरणाऱ्या संस्थेने गरजेचे आहे.

५) सदरहू सेवा पुरवितेवेळी शासकीय संस्था व परिसरामध्ये कोणतीही मोडतोड / नुकसान होणार नाही याबातची दक्षता कंत्राटधारक संस्थेने घ्यावयाची आहे. अशा प्रकारचे नुकसान झाल्यास त्याबाबत नुकसान भरपाई शासकीय दराने आकरण्यात येईल.

६) बागकाम कामगारांना महाराष्ट्र शासनाचे कामगार आयुक्तद्वारे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहील. कंत्राटदाराने बागकामगारांना भविष्य निर्वाह निधी जिवन विमा / आयुविमा, त्यांच्या अनुक्रमांक नुसार देण्यात यावे. त्यांच्या जिवितांची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर असेल या बाबत भविष्यात तक्रारी असल्यास संस्था जबाबदार राहणार नाही किंवा संबंधित कर्मचारी संस्थेविरूध्द न्यायालयात जावु शकणार नाही. संबंधित बागकाम कामगारांना याची जाणीव करून देणेची जबाबदारी संबंधित आपली राहील. कंत्राटदाराचे सेवाशुल्काचे व बागकामगारांचा वेतनाचा धनादेश एजन्सीला देय राहील. कंत्राटदाराने बागकामगारांचा पगार खात्यामध्ये वेतन जमा करणे बंधनकारक राहिल व त्यांची प्रत पुढील वेतनाच्या अगोदर संस्थेकडे कंत्राटदारास सादर करणे आवश्यक आहे.

७) कंत्राटधारक संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा विमा / अपघात विमा इ. कायदेशी बाबी कंत्राटदारने करावयाच्या आहेत. कंत्राटधारक संस्थेच्या कर्मचाऱ्यास काही अपघात / इजा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटधारक संस्थेची राहील.

८) सध्या अस्तित्वात असलेले व वेळोवेळी लागू होणारे सर्व कामगार कायदे पालन करणे हे कंत्राट धारक संस्थेस बंधनकारक राहील. (उदा. बालकामगार कामावर असु नयेत, नियमित वैद्यकिय तपासणी, किमान वेतन इत्यादी)

९) कोणत्याही कारणास्तव कोणत्याही पूर्व सुचना न देता सदर कंत्राट रद्द करण्याचे अधिकार संस्था प्रमुख यांना राहतील.

१०) सदर कंत्राटी सेवेचे काम एखादे दिवशी अपूर्ण काम अथवा काम समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आल्यास त्या दिवसाची देय रक्कम ठरलेल्या मासिक रकमेतुन कपात करण्यात येईल.

११) सेवा पुरविणाऱ्या संस्थेचे सर्व कर्मचारी योग्य गणवेशात व ओळखपत्रासहित असावेत. त्याची यादी संपूर्ण नाव, पत्ता व असल्यास दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांकासह कार्यालयास सादर करावी. यामध्ये बदल केल्यास त्या बाबत संस्थेस कळणे आवश्यक आहे. तसेच नजीकच्या काळातील फोटोसह बायोडाटा सादर करावा.

१२) शैक्षणिक संस्था असल्याने कोणत्याही कर्मचाऱ्याकडून गैरवर्तन घडू नये जसे कामावर नशा—पाणी करण्यात येणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील व तसे घडल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१३) निविदा सादर करतेवेळी रूपये २५०००/— (अक्षरी पंचवीस हजार फक्त) रक्कम डिमांड ड्राफ्ट (EMD) म्हणून प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांचे नावे देणे बंधनकारक आहे. निविदा स्विकृत न झालेल्या संस्थेस सदर डिमांड ड्राफ्ट कार्यवाहीनंतर परत करण्यात येईल.

१४) अंतिम स्विकृत निविदाधारकास वार्षिक ठेका रकमेच्या ०५ टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणुन महाविद्यालयाकडे रोख जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कम ठेका संपुष्टात आल्यानंतर परत करण्यात येईल. सदर्हू रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१५) कंत्राट स्विकृतीनंतर रूपये १००/— स्टॅम्प पेपर वर विहीत नमुन्यात करारनामा करून देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. आयकर क्लिअरन्स प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१६) निविदा भरलेल्या संस्थेने दिलेली माहिती व दाखले चुकीचे किंवा खोटे आढळल्यास सदर संस्थांनी सादर केलेल्या निविदा हया रद्द करण्याचे अधिकार संस्थाप्रमुखांकडे राहतील.

१७) कंत्राटदाराने पुरविण्यात आलेल्या बागकामगारांचे आपले काम व्यवस्थित करता किंवा नाही यासाठी पर्यवेक्षकाची नेमणूक करणे गरजेचे आहे.

१८) संस्थापरिसरातील बागेचे नियोजनपुर्वक बाग विकसित करण्यसाठी असणाऱ्या संस्थेच्या समितीला कंत्राटदाराने मदत करणे अनिवार्य राहील.

# बागकाम सेवा संबंधी अटी व शर्ती

०१) संस्था परिसरामधील गवत, लव्हाळ, डोंगसे, जंगली वनस्पती, झाडे–झुडपे काढणे तसेच झाडांची निगा राखणे, झाडांना पाणी देणे, नविन झाडांची लागवड, वेळोवेळी खत घालणे, ठिंबक सिंचनाची व्यवस्था इत्यादी सर्व कामे करणे हे कंत्राटदार संस्थेस बंधनकारक राहील.

०२) कामासाठी लागणारे सर्व साहित्य उदा. खोरे, खुरपे, टिकास, पाईप, पाटी इ. मक्तेदार संस्थेनने स्वत:चे आणावयाचे आहे.

०३) बागकामाचा दैनंदिन अहवाल बागकाम विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

०४) वरील कामाच्या व्यतिरिक्त संस्थाप्रमुख (प्राचार्य) व संस्थेच्या बागकाम प्रमुखांच्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील

०५) संस्थेच्या परिसरात सद्या अस्तित्वात असलेली मोठी झाडे / वृक्ष तोडू नयेत किंवा झाडांना/ वृक्षांना हानी पोहचणार नाही याची काळजी कंत्राटदाराने व त्यांच्या कर्मचाऱ्याने घेणे आवश्यक आहे. निविदेच्या मंजुरीनंतर आपणास कामाची सुरवात करणेबाबतचे आदेशातील (Work Order) देण्यात येणाऱ्या सुचनांची देखील अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

०६) सदरील कंत्राट हे प्रत्येक व्यक्ती प्रति महिना योग्य सेवा शुल्क आधारे देण्यात येईल. सेवाशुल्क नमुद करण्यात यावे नमुद न केल्यास सदरील निविदा रद्द करण्यात येईल अथवा सेवा शुल्काबाबत समिती जो निर्णय घेईल तो कंत्राटदारास मान्य असला पाहिजे तसेच सेवा शुल्क आकारणीसाठी आवश्यक नोंदणी योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे नोंदणी असणे आवश्यक आहे.

०७) वरील सर्व नियम व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे करारपत्र १००/– (शंभर रूपये) च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून संस्थेत सादर करणे बंधनकारक राहील.

सही :–

पदनाम :–

दिनांक

संस्थेचे नाव :–

# <u>कंत्राटी सेवा पुरविणाऱ्या संस्थेचा अनुभवाचा तपशिल</u>

## <u>प्रपत्र अ</u>

| अ.क्रं | यापूर्वी काम केलेल्या संस्थांचा तपशील (नाव व पत्ता) | कालावधी<br>पासून पर्यंत | संबंधित संस्थांचा दूरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

सही :—

पदनाम :—

दिनांक

संस्थेचे नाव :—